संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आंध्रमध्ये घटत्या लोकसंख्येची विचित्र समस्या

**भारत** हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीवादी देश जसा आहे तसाच आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देशही मानला जातो. ही लोकसंख्या भारतासाठी एक शक्ती म्हणूनही पाहिली जाते. अर्थात या मनुष्यशक्तीचा योग्य पद्धतीने वापर करून घेण्यामध्ये आपल्या सगळ्याच केंद्र किंवा राज्य सरकारांना अपयश आलेले आहे यात काही शंका नाही. आज बेरोजगारीचा प्रश्न सर्वात मोठा मानला जातो. त्याबरोबरच प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्याचे देखील तेवढेच मोठे आव्हान केंद्र आणि राज्य सरकारपुढे आहे. देशातील गरिबीची संख्या जरी कमी होत असली तरीसुद्धा आजही पोषक अन्नधान्य सगळ्याच गरिबांना मिळते असेही नाही. उलट देशातील ८० कोटी गरिबांना मोफत अन्नधान्य देण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागतो आणि त्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोगही होत आहे. सुदैवाने देशातील अन्नधान्य उत्पादन दरवर्षी वाढत आहे. पाऊस पाणी चांगले होत असल्याने देशाला आवश्यक असलेला अन्नधान्याचा साठा कायम ठेवून उरलेल्या अन्नधान्याची आपण निर्यातही करू शकतो. ही सगळी सकारात्मक परिस्थिती आहे. परंतु एकीकडे ही चांगली बाजू असतानाच दुसरीकडे मात्र काही राज्यांमध्ये लोकसंख्येचे प्रमाण घटत असल्याचे विचित्र चित्र समोर येत आहे. विशेषतः आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये गेल्या काही वर्षांपासून लोकसंख्येचा दर घटत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. दरवर्षी हे प्रमाण वाढत असल्याने आता त्या राज्यांपुढे ही घटती लोकसंख्या वाढवण्याचे एक वेगळेच आव्हान समोर ठाकलेले आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये समाजात सुशिक्षितपणा जरी वाढत असला तरी सुद्धा आपण पूर्णपणे सुरक्षित आहोत याची प्रत्येकाला खात्री वाटत नसते. अगदी दहा आकडी पगार घेणारी कुटुंबसुद्धा आर्थिकदृष्ट्या सुरक्षित मानली जाते, पण तिथे सुद्धा आपल्या कुटुंबाच्या सर्व गरजा पूर्ण होतील याची त्यांना खात्री वाटत नसते. म्हणूनच सध्या देशभर एकाच मुलावर किंवा एकाच अपत्यावर समाधान मानले जाते आणि दुसरा अपत्य होऊ दिले जात नाही. जेणेकरून कुटुंबातील सदस्यांची आबाळ होऊ नये किंवा आपला जीवनस्तर चांगला राहावा असा त्यामागचा दृष्टिकोन असू शकतो. जर तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशचे हे उदाहरण समोर घेतले तर लोकसंख्येतला हा असमतोल दूर करण्यासाठी आता तिथल्या सरकारांना लोकसंख्या वाढीसाठी प्रोत्साहनात्मक योजना राबवण्याची वेळ आलेली आहे.

### दुसऱ्या अपत्यासाठी प्रोत्साहन

अलीकडेच आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी पत्रकार परिषदेमध्ये असा विचारही प्रत्यक्ष बोलून दाखवला की, जे कुटुंब किंवा अपत्य दुसऱ्या मुलाला जन्म देतील त्यांना २५००० रुपयांचा प्रोत्साहन भत्ता दिला जाणार आहे. ही रक्कम एकाच वेळी दिली जाईल जेणेकरून सरकारच्यावतीने लोकसंख्या वाढीसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या तयारीत सरकार आहे. या निर्णयातून आंध्र प्रदेशात जी लोकसंख्या घटते आहे त्याला पायबंद बसेल आणि निर्माण होणाऱ्या असमतोलाला रोखण्यात यश येईल. अशीच परिस्थिती काही प्रमाणात तामिळनाडूमध्ये सुद्धा आहे आणि तशाच प्रकारचा विचार त्या राज्याचे मुख्यमंत्री स्टॅलीन यांनी बोलून दाखवला होता. भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात काही राज्यांमध्ये असलेला हा असमतोल एक विचित्र प्रकार ठरतो. किंबहुना तो आव्हानात्मक वाटू लागलेला आहे. भविष्यकाळामध्ये अन्य राज्यांमध्ये सुद्धा हीच परिस्थिती निर्माण होऊ शकते. जरी देशाची लोकसंख्या मोठी असली आणि जगात सर्वाधिक असली तरीसुद्धा काही राज्यांमध्ये घटत जाणाऱ्या लोकसंख्येचा देखील प्रश्न निर्माण होऊ शकतो. ही घटती लोकसंख्या त्या त्या राज्यांसाठी चिंताजनक ठरू शकते. काहीशी विचित्र वाटणारी परंतु समस्या निर्माण करणारी ही परिस्थिती आहे. म्हणूनच त्या विरोधात आतापासूनच सुरू केलेली उपाययोजना आणि त्याचे परिणाम समजून घेण्याची देखील आवश्यकता आहे. जर या पद्धतीने प्रोत्साहनपर रकमा देऊन त्या राज्यांची लोकसंख्या वाढवण्याचा निर्णय घेतला गेला तर ती वाढणारी लोकसंख्या पर्यायाने देशाच्या लोकसंख्येतही भर घालेल आणि आता सर्वाधिक लोकसंख्येच्या भारतात ती आणखीनच वेगाने वाढ नोंदवणारी ठरेल.

### भाषा आणि लोकसंस्कृती

सध्या शेजारच्या चीन देशातही हीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. एकेकाळी चीन हा देशातील सर्वात मोठा लोकसंख्या असलेला देश मानला जात होता, पण तिथे देखील लोकसंख्येत होणारी घट त्या देशापुढे अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरली आहे. विशेषतः काही महत्त्वाच्या नोकऱ्या आणि व्यवसायामध्ये लोक उपलब्ध होत नाहीत. मजूर किंवा लेबर म्हणूनही तिथे मोठी टंचाई निर्माण झालेली आहे. शिवाय तिथल्या सैन्य दलासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ आता आवश्यक त्या प्रमाणामध्ये उपलब्ध होत नसल्याबद्दल चिंता व्यक्त झाली होती. म्हणजेच यापूर्वी वाढत्या लोकसंख्येचे प्रश्न आणि भारतासारख्या देशाला त्याची घ्यावी लागणारी काळजी हा एक स्वतंत्र विषय होता तर दुसरीकडे भारतातल्याच काही राज्यांमध्ये घटत जाणाऱ्या लोकसंख्येची अशीदेखील एक चिंता भेडसावते आहे. त्या संदर्भामध्ये भविष्यकाळात सुद्धा राष्ट्रीय स्तरावर काही वेगळा निर्णय घेण्याची वेळ येते की काय असे वाटू लागते. हा लोकसंख्येतला असमतोल भारतातही सांस्कृतिक आणि सामाजिकदृष्ट्या विचार करण्यासारखा ठरतो. उदाहरणार्थ आंध्र प्रदेशमध्ये तेलगू भाषा बोलणाऱ्या स्थानिक लोकांची संख्या कमी होणे म्हणजेच नकळतपणे त्याचा तिथल्या परंपरागत सांस्कृतिक आणि सामाजिक वातावरणावर घडून येणारा मोठा परिणाम ठरतो. भारत हा अनेक राज्यांचा अनेक संस्कृती, परंपरा किंवा लोकसंस्कृतीचा देश आहे. प्रत्येकाच्या प्रादेशिक भाषिक किंवा सांस्कृतिक अस्मिता तितक्याच महत्त्वाच्या ठरतात. या दृष्टीकोनातूनसुद्धा आंध्र किंवा तामिळनाडूतली घटती लोकसंख्या त्यांच्यासाठी चिंता ठरते.